खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

## राष्ट्रीय सेवा योजना – मतदार दिन अभियान

प्रभात

### नवमतदारांनी घेतली मतदानाची शपथ

#### राजगुरूनगरात राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त मतदार जनजागृती रॅली



**राजगुरूनगर, दि. २५ (प्रतिनिधी)** - खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघ व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राजगुरूनगर शहरामध्ये मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करत राष्ट्रीय मतदार दिवस गुरुवारी (दि. २५) साजरा करण्यात आला. यावेळी नवमतदारांना मतदानाची शपथ देण्यात आली.

याप्रसंगी मतदार नोंदणी अधिकारी तथा खेडचे उपविभागीय अधिकारी जोगेंद्र कट्यारे, सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार प्रशांत बेडसे, गटशिक्षण अधिकारी तथा नोडल अधिकारी अमोल जंगले, प्रभारी निवडणूक नायब तहसीलदार राम बीजे, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य एच. एम. जरे, निवडणूक विभागातील महेश खंडागळे आदी उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट निवडणूक कामकाज करणार्या कर्मचारी तसेच मतदार जनजागृतीमध्ये विशेष सहभाग नोंदविणाऱ्या महाविद्यालयांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्हे देऊन गौरवण्यात आले.

PuneDistrict, 26 Jan 2024, Page:010
https://epaper.dainikprabhat.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभागप्रमुख